# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भरणे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे सतत वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(१) ३४७९९ (२३-१२-२०१५). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरणे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील महावितरण कंपनीच्या अधिपत्याखाली येणाऱ्या फिडरमध्ये माहे जूलै, २०१५ पासून होणाऱ्या सततच्या तांत्रिक बिघाडामुळे वीज पुरवठा खंडीत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरणे फिडरमध्ये विद्युत रोहित्रामधील दुरुस्ती व देखभालीकडे महावितरणचे अभियंता व वायरमन दुर्लक्ष करीत असल्याने भरणे फिडरच्या अधिपत्याखाली वीज पुरवठा सतत खंडीत होत असल्याने सदर फिडर मधील तांत्रिक दोष दूर करुन ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७) :** (१) खेड उपविभागांतर्गत येणाऱ्या ३३/११ के.व्ही. खेड उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. भरणे फिडरवर भरणे, वेरळ सुकिवली, कुडोशी, तले, रसाळगड, मांडवे, पुरे, वाडी, बेलदार, शिंगरी, दहिवली, किंजळे, घोगरे अशी ३४ गावे व वाडया असून सदर भाग अतिदुर्गम व डोंगराळ आहे. त्यामुळे सदर फिडरवरील वीज पुरवठा सुरळीत राहण्याकरिता भरणे फिडरवरील कुडोशी, तले, रसाळगड, पुरे शिंगरी, दहिवली ते घोगरे बौध्दवाडी इत्यादी साधारण ५०% डोंगराळ भागातील गावे ३३/११ के.व्ही.आंबवली उपकेंद्रामधून

निघणाऱ्या ११ के.व्ही. कुडोशी फिडरवर सप्टेंबर, २०१७ मध्ये जोडण्यात आली आहेत. वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

(२) भरणे वाहिनीची देखभाल व दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच सदर वाहिनीवरील वीज पुरवठा सुरळीत राहण्याकरिता ३३/११ के.व्ही.आंबवली उपकेंद्रामध्ये मार्च, २०१७ मध्ये अतिरिक्त ५ एमव्हीए चे रोहित्र कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयामध्ये वीज ग्राहकांनी वीज जोडणीचे पैसे भरुनही वीज न मिळाल्याबाबत**

**(२) ३५३०४ (२३-१२-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये सुमारे २५००० पेक्षा जास्त शेतकरी, औद्यागिक, घरगुती व व्यावसायिक ग्राहकांनी वीज जोडणी मिळण्यासाठी पैसे भरले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पैसे भरुनही ग्राहकांना अदयापपर्यंत वीज जोडणी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७) :**(१) सांगली जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०१७ अखेर शेतीपंप-१५५८७, औद्योगिक-१९७, घरगुती-५२५६ व व्यावसायिक-५१३ असे एकूण २१,५५३ इतके ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२) सांगली जिल्ह्यामध्ये शेतीपंप, घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहक मिळून सन २०१५-१६ मध्ये ३६,१५५, २०१६-१७ मध्ये ३०,४७५, व सन २०१७-१८ मध्ये सप्टेंबर, २०१७ अखेर १३,०२८ ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

(३) सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु. ८.८ कोटी इतका निधी मंजूर होता. त्यामध्ये २८८ शेतीपंप, ७९४ घरगुती व इतर विद्युतीकरणाची कामे करण्यात आली असून सन २०१७-१८ करिता सदर योजनेअंतर्गत रु. १० कोटी इतका निधी मंजूर असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर ग्रामीण येथील महावितरण परिमंडळाचे विभाजन करण्याबाबत**

**(३) ३५७०१ (२३-१२-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) नागपूर येथील ग्रामीण परिमंडळाचे विभाजन करुन चंद्रपूर व गोंदिया तसेच अकोला परिमंडळाचेही विभाजन करुन अकोला व अमरावती परिमंडळ स्थापन करण्याची घोषणा मा.ऊर्जामंत्री यांनी नागपूर येथे दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीच्या ठराव क्र. ४५३ दिनांक २७.०८.२०१५ नुसार आदेश क्र. ३२८५७ दिनांक ०२.०९.२०१५ अन्वये नागपूर ग्रामीण परिमंडळाचे विभाजन करुन चंद्रपूर व गोंदिया या दोन परिमंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच महावितरण आदेश क्र. ३२८४५ दिनांक २.०९.२०१५ अन्वये अमरावती परिमंडळ, अकोलाचे विभाजन करुन अमरावती व अकोला परिमंडळांची निर्मिती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गिरवली (ता.भुम, जि.उस्मानबाद) येथे २२० केव्ही वीज उपकेंद्र होण्याबाबत**

**(४) ३५७३२ (२३-१२-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरवली (ता.भुम, जि.उस्मानबाद) येथे २२० केव्ही वीज उपकेंद्र होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागील दोन वर्षापासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गिरवली (ता.भूम,जि.उस्मानाबाद) परिसरास महावितरण कंपनीच्या ३३ के.व्ही.ईट उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. सदर उपकेंद्रास महापारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. भूम उपकेंद्रातून वीज पुरवठा करण्यात येतो. १३२ के.व्ही. भूम उपकेंद्राची स्थापित क्षमता १०० एम.व्ही.ए. (५० एम.व्ही.ए., १३२/३३ के.व्ही. चे दोन रोहित्रे) असून सदर उपकेंद्रावर ५५ मे.वॅ. उच्चतम वीज भाराची नोंद आहे. या उपकेंद्रात क्षमता शिल्लक असल्याने सद्यस्थितीत गिरवली येथे वेगळ्या अति उच्च दाब केंद्राची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोहगण (ता.रावेर, जि.जळगाव) येथे आदिवासी उपयोजनेंतर्गत मंजूर झालेल्या वीज उपकेंद्राचे काम अद्यापही सुरु न झाल्याबाबत**

**(५) ३६०८८ (२३-१२-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहगण (ता.रावेर, जि.जळगाव) येथे आदिवासी उप योजनेंतर्गत मंजूर झालेल्या उप केंद्राचे काम अद्यापही सुरु झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपकेंद्राचे काम सुरु न झाल्याने शेतक-यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपकेंद्राचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७) :**(१), (२) व (३) ३३ के.व्ही उपकेंद्र मोहगण उपकेंद्रास सन २००७ मध्ये तांत्रिक मान्यता महावितरण कंपनीकडून देण्यात आली होती. परंतु सदर कामासाठी आवश्यक निधी आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून सन २०१२ मध्ये प्राप्त झाला. तद्नंतर, उपकेंद्र उभारणीच्या खर्चात वाढ झाल्यामुळे वाढीव निधी माहे एप्रिल, २०१६ मध्ये प्राप्त झाल्यानंतर सदर उपकेंद्राचे काम पूर्ण होऊन ते दिनांक १९.०३.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भालूर, साकोरे (ता.नांदगाव, जि.नाशिक) या गावातील महावितरणच्या विद्युत उपकेंद्राची कामे बंद असल्याबाबत**

**(६) ३६४९४ (२३-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भालूर, साकोरे (ता.नांदगाव, जि.नाशिक) या गावातील महावितरणच्या ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र उभारणीचे काम अनेक दिवसांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून अनुषंगाने विद्युत उपकेंद्रांच्या उभारणीची कामे जलद गतीने पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-१२-२०१७) :**(१) व (२) ३३/११ के.व्ही.साकोरे उपकेंद्राचे काम पूर्ण झालेले असून ते दिनांक ३१.०८.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. ३३/११ के.व्ही. भालूर उपकेंद्राचे काम दिनांक ३१.१२.२०१३ रोजी कंत्राटदारास दिलेले होते. कंत्राटदाराने काम

वेळेत न केल्यामुळे सदर काम त्याच्याकडून काढून घेऊन नाशिक परिमंडळ स्तरावर समांतर निविदा काढण्यात आली व दिनांक १९.०९.२०१७ रोजी दुस-या कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेला आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिन्यांचा आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावली, ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यामध्ये विद्युत उपकेंद्र मंजूर होण्याबाबत**

**(७) ३७७५५ (०८-११-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाच्यावतीने इन्फ्रा-२ मध्ये आणि दिनदयाल योजने अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील सावली तालूक्यातील निफंद्रा, हरंबा, कढोली, ब्रम्हपूरी तालूक्यातील मुडझा, मेंडकी, चौगान किन्ही, मौशी, सिंदेवाही तालूक्यातील नलेश्वर मोहाडी यासह अनेक गावात उपकेंद्र सुरू करण्यासाठी मंजूरी प्राप्त होवून सुध्दा अदयापही कामास प्रारंभ झाले नसल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील सावली, ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही तालूक्यामध्ये महावितरण कंपनीच्या माध्यमातून कोणकोणत्या गावात किती केव्हीचे उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, सावली, ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही तालूक्यामध्ये उपकेंद्र मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :**(१), (२) व (३) सावली तालुका अंतर्गत हरंबा व कढोला या दोन्ही गावांकरिता कढोला येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये प्रस्तावित आहे. तसेच निफंद्रा येथे ३३/११ के.व्ही. महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे. ब्रम्हपूरी तालुक्यातील चौगान किन्ही येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत प्रस्तावित आहे. मौजा मुडझा ऐवजी मौजा आवळगांव व मौजा मोशी ऐवजी मौजा मोहाडी मोकासा येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्र महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित केलेले आहे. सिंदेवाही तालुक्यातील नलेश्वर मोहाडी येथे उपकेंद्र महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहेत. चंद्रपूर जिल्हयातील सावली, ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही तालुक्यातील प्रस्तावित उपकेंद्रापैकी इन्फ्रा-२ योजनेमध्ये समाविष्ट असलेले उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हैसाळ योजनेंतर्गत ८३ गावातील शेतकऱ्यांची पाणीपट्टी माफ करण्याबाबत**

**(८) ३९२२६ (११-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येणा-या म्हैसाळ योजनेंतर्गत ८३ गावांतील ७० हजार शेतकऱ्यांची पाणी पट्टी माफ करावी व वीज बिल थकबाकी टंचाई निधीतून भरावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वीज वितरण कंपनीकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) पाणी पुरवठा योजनांसाठी "पेयजल पाणी पुरवठा योजना-२०१५ लागू केलेली आहे. परंतु म्हैसाळ योजना ही उपसा जलसिंचन योजना असून वीज दराच्या उच्चदाब कृषी वर्गवारीत मोडते. म्हैसाळ योजनेस कृषी ग्राहकांसाठी असलेल्या कृषी संजीवनी योजना-२०१४ चा लाभ दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरणच्या लातूर परिमंडळाच्या सन २०१३ मध्ये इन्फ्रा २ ची मंजूर कामे पूर्ण होण्याबाबत**

**(९) ३९६०१ (१३-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर परिमंडळाच्या माध्यमातून सन २०१३ मध्ये इन्फ्रा २ ला मंजूरी देण्यात आली असून या योजनेची मुदत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये संपत असून या योजने अंतर्गत आतापर्यंत फक्त १० ते १५ टक्केच कामे पुर्ण झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इन्फ्रा २ मध्ये टेंडरप्रमाणे काम झाले नाही त्यामुळे लातूर, बीड व उस्मानाबाद या जिल्हयातील ७० हजार शेतकऱ्यांना वीजपुरवठा करण्यात आला नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे या योजनेमधील निधी व्यपगत होण्याची शक्यता असून २५७ कोटी रुपयांपैकी केवळ ५० कोटीचीच कामे झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७)** :(१) इन्फ्रा-२ योजनेची मुदत मार्च, २०१९ पर्यंत वाढविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. लातूर परिमंडळातील या योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे ६०% पूर्ण झालेली आहेत.

(२) लातूर परिमंडळातील इन्फ्रा-२ मध्ये लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याकरिता शेतीपंपाची तरतुद निरंक आहे. बीड, लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मार्च, २०१७ अखेर पैसे भरुन प्रलंबित कृषीपंप अर्जदारांची संख्या १३०५४ एवढी असून सन २०१७-१८ मध्ये ऑगस्ट, २०१७ अखेर २३६९ इतक्या कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) लातूर परिमंडळातील इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत सुमारे रु.१९६ कोटीची कामे झालेली आहेत.

(४) उद्दिष्टापेक्षा कामाचा वेग कमी असलेल्या कंत्राटदारांना कामाचा वेग वाढविण्यासाठी निविदेतील तरतूदीनुसार वेळोवेळी “नोटीस टु करेक्ट व नोटीस टु टर्मिनेट” देण्यात आलेल्या असून उर्वरित कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच रु. ५ कोटीपर्यंत तातडीची कामे करण्यासाठी निविदा काढण्याचे अधिकार स्थानिक मुख्य अभियंता यांना देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर व उस्मानाबाद या जिल्ह्यात आदिवासी पारधी समाजाला घरकुल योजनेसाठी निधी मिळण्याबाबत

**(१०) ३९७४८ (२९-०४-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यात आदिवासी पारधी समाज मोठया प्रमाणात राहत असतानाही या दोन्ही जिल्ह्यात मिळनू फक्त २०० जणांची निवड घरकुल योजनेकरिता २०१२ मध्ये करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरकुल योजनेचा लाभ तीन वर्ष होऊनही अद्याप त्यांना देण्यांत आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घरकुल योजनेकरिता निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-११-२०१७)** :(१) नाही. सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात पारधी समाजातील लाभार्थीसाठी सोलापूर जिल्हयाकरीता ३५९ व उस्मानाबाद जिल्हयाकरीता १२८ अशी एकूण ४८७ घरकुले मंजुर केलेली आहेत.

(२) नाही.

(३) सोलापूर जिल्हयाकरीता रु.३५९.०० लक्ष व उस्मानाबाद जिल्हयाकरीता रु.१२८.००लक्ष असा एकूण रु.४८७.००लक्ष इतका निधी मंजुर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे तरडी (ता.पारोळा, जि.जळगाव) येथील एका शेतकऱ्याचा विजेचा धक्का लागून झालेला मृत्यू**

**(११) ४६०४० (२०-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तरडी (ता.पारोळा, जि.जळगाव) येथील कै.सुभाष साहेबराव पवार यांचा दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी शेतातील कृषी वीज पंपामुळे इलेक्ट्रिक शॉक लागून मृत्यू झाला असून अद्यापही विज मंडळाकडून त्यांच्या कुटुंबियास कोणतीच आर्थिक मदत देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी वीज महामंडळाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, जळगाव, यांनी चौकशी केली आहे.
(३) दि . २२ सप्टेंबर, २०१५ रोजी कृषी पंपाला वीज पुरवठा करणाऱ्या रोहित्राच्या वितरण पेटीतील केबलचे इन्सुलेशन निघाल्यामुळे वीजवाहक तार वितरण पेटीच्या संपर्कात येऊन वितरण पेटी विद्युत भारीत झाली होती व त्या वितरण पेटीच्या संपर्कात आल्यामुळे वीजेचा शॉक लागून कै. सुभाष साहेबराव पवार यांचा मृत्यु झाला. त्यांच्या पत्नी श्रीमती अनिताबाई सुभाष वंजारी (पवार) यांना महावितरण कंपनीमार्फत मदत म्हणून रु. २,००,०००/- देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे खळेगांव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीबाबतच्या असलेल्या विविध समस्यांबाबत**

**(१२) ५६७८२ (१६-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खळेगांव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीबाबतच्या असलेल्या विविध समस्यांबाबत दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा सुमारास

ग्रामंपयायत कार्यालय, खळेगांव यांनी मा.कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी कार्यालय, खामगांव व सहा. अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी कार्यालय, लोणार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणत्या तक्रारी करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने समस्यां सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) निवेदनात नमूद तक्रारी खालील प्रमाणे आहेत :-

- खळेगाव फाटयाकडील मागासवर्गीय कुटुंबासाठी अतिरिक्त गावठाण फिडर वाहिनीचे काम करणे.
- खळेगाव गाव अंतर्गत प्रलंबीत गावठाण फिडर वाहिनीची कामे करणे.
- खळेगांव, भंडारी, खंडारी, कोनाटी, देऊळगांव कोळ, महार चिकना, कारेगांव इत्यादी गावासाठी असलेल्या नळपाणी पुरवठा योजनेच्या विहिरीजवळ गावठान फिडर टाकणे.
- खळेगांव येथील शिवना पिसा रोड वरील धनगर समाजाच्या वस्तीकरीता अजनी खुर्द गावावरुन गावठाण फिडर करणे.
- खळेगांव गावाअंतर्गत देखभाल दुरुस्तीची कामे करणे.

(३) देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने महावितरण कंपनी तर्फे तातडीने कार्यवाही करण्यात आली असून खळेगांव परिसरातील वाकलेले पोल सरळ करण्यात आले आहेत तसेच विद्युत तारांची कामे करण्यात आली आहेत व वरील मागणीनुसार पंडीत दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये ११ केव्ही उच्चदाब वाहीनी - ३३.०० किमी, लघुदाब वाहीनी - १०.०० किमी, वितरण रोहित्र ३०, रोहित्र देखभाल दुरुस्ती - १५, ऐरीयल बंच केबल - ०३.०० किमी. इ. बाबी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. सदर कामांचे कार्यादेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती जमातीतील प्रत्येक लाभार्थ्यांस घरकूल देण्याचा घेतलेला निर्णय**

**(१३) ६८३५१ (११-०१-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग**

**बरोरा (शहापूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती जमातीतील प्रत्येक लाभार्थ्यांस सन २०१९ पर्यंत घरकूल देण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरात घरकूल द्यावयाच्या लाभार्थ्यांची संख्या किती आहे,

(३) तसेच त्यानुसार प्रतिवर्षी किती लाभार्थ्यांना घरकुले देण्याचा निर्णय घेतला आहे,

(४) तसेच घरकुलाचे लक्ष पूर्ण करण्यासाठी किती रक्कमेची तरतूद शासनाने केली आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१७) :** (१) बेघर किंवा कच्चे घरकुल असलेल्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना सन २०२२ पर्यंत घरकुल देण्याचा शासनाचा मानस आहे.

(२) व (३) सामाजिक, आर्थिक , जात जनगणना (SECC) २०११ च्या डाटा नुसार वेगवेगळया वगळण्याच्या निकषानुसार (exclusion criteria) प्रधानमंत्री आवास योजनेतून वगळलेले परंतू पक्के घरकुल नसलेले ३३६१३ लाभार्थी शबरी आदिवासी घरकुल योजनेकरीता पात्र आहेत. त्यानुसार सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन आर्थिक वर्षाकरीता अनुक्रमे ११२०५,११२०५ व ११२०३ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(४) शबरी घरकुल योजनेकरिता सन २०१७-१८ करीता रु.१४० कोटी इतकी तरतुद केली आहे.

---

**पालघर जिल्हयातील आदिवासी बचत गटांना दिलेल्या**
**डीजे साहित्य वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१४) ७१३८३ (९-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई तहसिलदार कार्यालयावर आदिवासींच्या वन हक्कासाठी कॉ.गोदवरी परुळेकर मार्क्सवादी विचार मंचाच्या वतीने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या प्रमुख मागण्या काय आहेत,

(३) असल्यास, सदर मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक व बायोमेट्रीक हजेरी आश्रमशाळांना बंधनकारक करण्याबाबत**

**(१५) ७५८२१ (२८-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणा-या ११०९ आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची खोटी पटसंख्या रोखण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला आधार क्रमांक व बायोमेट्रीक हजेरी सादर करण्याचे बंधन घालण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-११-२०१७) :** (१) हे खरे आहे. आदिवासी विकास विभागाच्या सर्व अनुदानित आश्रमशाळांतील सर्व विद्यार्थ्यांना आधार क्रमांक व बायोमेट्रीक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे.

(२) तथापि ग्रामीण भागातील वीजेची उपलब्धता, विद्यार्थ्यांचे लहान वय व इंटरनेटची सुविधा यामुळे दुर्गम भागात बायोमेट्रीक उपस्थिती नोंदण्यामध्ये येणा-या अडचणी विचारात घेवून प्रथम अनुदानित व शासकीय आश्रमशाळांतील सर्व विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक काढण्यात येत आहेत, त्यानंतर बायोमेट्रीक उपस्थितीबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा गौण खनिज विभागाला कायमस्वरुपी वाहन नसल्याबाबत**

**(१६) ७७२२० (१२-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा गौण खनिज विभागाला कायमस्वरुपी स्वत:चे वाहन नसल्याने वाळू तस्करांवर कारवाई करणे तसेच इतर तातडीच्या शासकीय कामासाठी बाहेर जाताना अडचणी येत असल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्हा गौण खनिज विभागाला वाहन मिळण्याबाबत गत २ वर्षापासून जिल्हाधिकारी यांनी १६ वेळा शासनाला पत्र व्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्हा खनिकर्म विभागाला कायमस्वरुपी वाहन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-११-२०१७) :** (१) अहमदनगर जिल्ह्यातील वाळू साठ्याचे सर्वेक्षण करणे, वाळू साठ्याचे अंतर पाहणे तसेच जिल्ह्यातील दगड खाणी, मुरूम यांची तपासणी करणे, तसेच वाळू तस्करांवर कारवाई करणे या करिता उपसंचालक प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर यांना मागणीनुसार वाहन उपलब्ध करून दिले आहे.

(२) होय.

(३) भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना २० नवीन वाहने खरेदी करण्यास शासनाकडून परवानगी देण्यात आली होती. त्यानुषंगाने संचालनालयाने १६ वाहने खरेदी केलेली असून, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, प्रादेशिक कार्यालय आणि राज्यातील विविध जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सदर वाहने संचालनालयाच्या स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील नऊ आश्रमशाळांतील २२३ कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन रोखण्यात आल्याबाबत**

**(१७) ७८२४० (२८-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नऊ आदिवासी आश्रमशाळांमध्ये भौतिक सुविधांचा अभाव असल्याचे कारण दाखवत कळवण प्रकल्प अधिकाऱ्याने २२३ कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन रोखले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन रोखल्याबाबत कळवण प्रकल्प अधिकाऱ्याने भौतिक असुविधेबाबत संस्था चालकांना नोटीस बजावली आहे काय,

(३) नसल्यास,संस्था चालकांना नोटीस न देता कर्मचाऱ्यांना वेठीस धरणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२३-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) भौतिक असुविधांबाबत प्रकल्प अधिकारी, कळवण यांनी संस्था चालकांना नोटीस बजावल्या असून कोणत्याही अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचा-यांचे नियमित वेतन रोखण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अपंगाना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे योजनेमध्ये सुधारणा करणेबाबत**

**(१८) ८००५४ (२१-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपंगाना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे या योजनेमध्ये सुधारणा करण्याची मागणी जिल्हा अपंग पूनर्वसन अधिकारी, यांनी सचिव, समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडे दिनांक ९, नोव्हेंबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१७) :** (१) व (२) राज्य शासनाच्या अपंगांना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे या योजनेमध्ये सुधारणा करण्याच्या मागणीबाबतचा प्रस्ताव जिल्हा अपंग पूनर्वसन अधिकारी, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, विरार, जि.पालघर यांच्या दि.८नोव्हेंबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये अपंग कल्याण आयुक्तालयास प्राप्त झाला आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव अपंग कल्याण आयुक्तालयाकडून शासनास पाठविण्यात आलेला असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फ़त प्रस्तूत प्रस्ताव मान्यतेसाठी नियोजन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**पहेला (ता.जि.भंडारा) येथील निवासी आदिवासी विद्‌यार्थी**
**नसताना शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत**

**(१९) ८४५३६ (२८-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहेला (ता.जि.भंडारा) येथे CHW नावाची अनुदानित आश्रमशाळा सुरु असून सन २०१४ ते २०१७ पर्यंत आश्रमशाळेत एकही निवासी विद्‌यार्थी नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळेत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन सन २०१४ पासून मिळालेले नसून निवासी आदिवासी विद्‌यार्थी नसल्याने शाळेला मान्यता मिळू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच सदरहू आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. सदर आश्रमशाळेचे नाव CSW अनुदानित आश्रमशाळा पहेला, ता.जि.भंडारा असे आहे.

(२) शाळेचे मुख्याध्यापक हे आहरण व संवितरण अधिकारी असल्याने त्यांच्याकडून शाळेतील कर्मचाऱ्यांची वेतन देयके प्रकल्प कार्यालयास सादर केली नसल्याने सदर शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात आलेले नाही.

(३) होय.

वासनिक शिक्षण संस्था, पहेला द्वारा संचलित अनुदानित आश्रमशाळा वासेरा ही शाळा मौ.वासेरा, ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर येथून पहेला येथे स्थलांतरीत करण्यास दि.०९ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली होती. सन २०१४-१५ या शैक्षणिक सत्रात शाळा सुरु झालेली नसल्याने एकही विद्यार्थी प्रवेशित नव्हता. सन २०१५-१६ या सत्रात इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये ३९ बहिस्थ विद्यार्थी प्रवेशित होते परंतू एकही निवासी विद्यार्थी प्रवेशित नव्हता. तसेच सन २०१६-१७ या शैक्षणिक सत्रात शाळेत एकही निवासी विद्यार्थी प्रवेशित नसल्याचे आढळून आले.

(४) प्रकल्प अधिकारी भंडारा व अपर आयुक्त, नागपूर यांनी दिलेल्या अहवालानुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी सुनावणी आयोजित करुन दि.३०.०३.२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर शाळेची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मार्गताम्हाणे (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील प्रस्तावित एमआयडीसी रद्द करणेबाबत

**(२०) ८५११९ (१८-०८-२०१७). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्गताम्हाणे (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने ३ हजार ३०० हेक्टर जमीन संपादित करण्याबाबतची भूसंपादन प्रक्रिया सन २०१० साली सुरु केली असून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करिता ६अ ची नोटीस काढण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे खरेदी विक्री, हस्तांतरण तसेच निवासी प्रयोजन वापराकरिता लागणाऱ्या सर्व परवानग्या थांबविल्या असल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसीला जमीन देण्यास तेथील शेतकऱ्यांचा विरोध असून याठिकाणी पर्यटनदृष्ट्या निवासी संकुले, फळबागा व शेती याकरिता जास्त मागणी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता मार्गताम्हाणे एमआयडीसी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

महामंडळाने संयुक्त मोजणीसाठी उप अधीक्षक, भूमि अभिलेख चिपळूण व गुहागर यांचकडे मोजणी फी भरलेली आहे. तथापि, स्थानिकांचा विरोध असल्याने संयुक्त मोजणी होऊ शकली नाही.

(२) हे खरे आहे.

तत्कालीन प्रादेशिक अधिकारी रत्नागिरी यांनी जमीन धारकाच्या ७/१२ खाते उताऱ्यावर भूसंपादनाकरिता शिक्के पडले असल्यामुळे सदर घरबांधणी अथवा इतर बांधकामे तसेच वृक्ष लागवड इ. परवानगी देण्यात येऊ नये असे पत्र दिले होते.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदरचे क्षेत्र विनाअधिसूचित करण्याच्या प्रस्तावावर महामंडळ स्तरावर पडताळणी सुरु आहे.

---

## मुंबईतील पवन सहकारी पतसंस्थेच्या दप्तर व अभिलेखांच्या चौकशीची कार्यवाही सह निबंधकांनी प्रलंबित ठेवल्याबाबत

**(२१) ८५३४० (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुंबईतील, पवन सहकारी पतसंस्था (ई-विभाग, मुंबई-९) या संस्थेच्या दप्तर व अभिलेख्यांची अधिनियमाच्या कलम ८१ (३) (ब) अन्वये चौकशीचे आदेश विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकार संस्था (फिरते पथक) यांना दिले असताना सदरहू संस्थेच्या कार्यकारणीने सन २०००-२०१३ या कालावधीत केलेल्या गैरव्यवहाराच्या बाकी राहिलेल्या मुद्यांची चौकशी करण्यास विशेष लेखापरिक्षक यांना मान्यता देण्याबाबत, संस्थेच्या माजी सचिवांनी विभागीय सह निबंधक यांना दिनांक २४ ऑक्टोंबर,२०१६ रोजी व त्यानंतर अनेकवेळा निवेदन देऊनही त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे आदेश प्राप्त झाले असतानाही सन २०००-२०१३ या कालावधीत, केलेल्या गैरव्यवहाराच्या बाकी राहिलेल्या मुद्याची चौकशी करण्यास सह निबंधकांनी, विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ यांना अद्याप मान्यता न देण्याची व त्यास लागत असलेला विलंब व दुर्लक्षाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

संस्थेचे माजी सचिव श्री. बबन मुटके यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१(फिरते पथक) यांची नेमणूक केली. सदर प्रधिकृत अधिकाऱ्यांनी म.स.सं. अधिनियमाच्या कलम ८३(१) अन्वये

चौकशी करुन सदर अहवाल दिनांक २२.९.२०१४ रोजी विभागीय सहनिबंधक कार्यालयास सादर केला आहे.

(३) प्रकरणी वरील प्रमाणे कार्यवाही झाली असतानादेखील तक्रारदाराने पुन्हा त्याच मुद्द्यांबाबत दिनांक ७.६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारअर्ज दाखल केला. त्यानुषंगाने पुढील चौकशी करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २६.७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई(१) यांना कळविले.

त्यानुसार अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी प्रधिकृत अधिकारी म्हणून श्री. सतीश तोटावार, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सी विभाग यांची दिनांक १५.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये नेमणूक करण्यात आली. संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांनी दिनांक ३१.३.२०१७ रोजी त्यांच्या अहवाल सादर केला असून सदर अहवालामध्ये कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याचे अभिप्राय दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील वृद्ध महिलेला फसविल्या प्रकरणी अवैध सावकाराला विभागीय सहनिबंधक अमरावती यांनी निर्दोष ठरवल्याबाबत**

**(२२) ८६८०५ (१८-०८-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील सरिता धोटे या वृद्ध महिलेला फसविल्या प्रकरणी अवैध सावकार मंगूसिंग राठोड याला पोलीस तपासात दोषी ठरविले असतानाही विभागीय सहनिबंधक अमरावती यांनी निर्दोष ठरवल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्रीमती धोटे यांनी सहायक निबंधक, दारव्हा व जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांच्याकडे तक्रार केली असता दोन्ही कार्यालयाने श्रीमती धोटे यांच्या बाजूने निकाल दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रीमती धोटे यांना सावकाराकडून स्वजमीन मिळत नसल्याने त्यांनी राज्यपालांना निवेदन पाठवून इच्छा मरणाची परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, श्रीमती धोटे यांना त्यांची जमीन परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-११-२०१७) :** (१) नाही.

(२) सहाय्यक निबंधक, दारव्हा यांच्या अहवालानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८ (२) अन्वये श्री. मंगुसिंग राठोड यांचेकडून श्रीमती सरिता धोटे यांना शेती परत करण्याचे आदेश दि.०२.०२.२०१६ रोजी पारित केलेले होते. सदर आदेशाविरूध्द कलम १८ (४) नुसार विभागीय सहनिबंधक, अमरावती यांच्याकडे अपिल दाखल करण्यात आले होते. सदर आदेशामध्ये संबंधितांना महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे नियम १७ नुसार साक्ष पुरावा सादर करण्याची तसेच उलट तपासणी घेण्याची संधी न देता तसेच करारनाम्याची सत्यता न पडताळताच जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांनी आदेश पारित केलेला असल्याचे कारणावरून जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांचा आदेश रद्द करण्यात आला आहे. तसेच सदर आदेशाबाबत कायदा व नियमानुसार फेरनिर्णय घेण्यासाठी विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांना दि. ३०.०३.२०१७ च्या आदेशानुसार आदेशीत केलेले आहे.

(३) व (४) असे निवेदन प्राप्त झाले आहे. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांचा दि.०२.०२.२०१६ रोजीचा आदेश रद्द करून कायदा व नियमानुसार फेरनिर्णय घेण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांना दि. ३०.०३.२०१७ रोजीच्या आदेशानुसार आदेशीत केलेले आहे.

(५) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरू आहे.

---

### उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तुरी साठविण्यासाठी गोदाम उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) ८६८६० (१८-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळंब येथील शासकीय गोदामामध्ये इतर जिल्ह्यातील तूर साठविल्यामुळे कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांची तुरीची मापे घेण्यास विलंब होत होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी कृषि उत्पन्न बाजार समिती कळंब यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांस वेळोवेळी लेखी स्वरुपात कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोदाम उपलब्ध करुन देवून त्या ठिकाणी तूर साठविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१७) :** (१) होय.

(२) लातूर जिल्ह्यातील गोदाम पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे, खरेदी केलेली तूर कळंब जि.उस्मानाबाद येथे साठविण्यात आली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर अपूरा कर्मचारी वर्ग असल्याने तूरीची मापे घेण्यासाठी विलंब होत होता. तथापि, खरेदी केंद्रावर आलेल्या सर्व शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) कळंब येथे खरेदी केलेली तूर गोदामात साठविण्यासाठी कुर्डुवाडी,फलटण,चिंचोळी, अकलूज या ठिकाणी पाठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) रत्नागिरी येथील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२४) ८६९४२ (१८-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) रत्नागिरी येथे पाच वर्षापूर्वी केलेल्या रस्त्यांची दूरवस्था झालेली असल्याने जे.के.फाईल्स ते विद्यापीठ अथवा गद्रे कंपनीपर्यंत वाहने नेणे अडचणीचे ठरत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबतचे निवेदन उद्योजकांच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांची भेट घेऊन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) रत्नागिरी औद्योगिक क्षेत्रातील रस्ते दुरूस्त करणेसाठी महामंडळाकडून रुपये ७८९.७० लक्ष रकमेची निविदा दिनांक २४/३/२०१७ रोजी उघडण्यात आली आहे. रस्ते दुरूस्तीची कामे तात्काळ चालू करण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत रस्त्यावरील खड्डे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात येत आहेत.

---

**शासनाच्या नविन इमारतीच्या छतावर सौर प्रकल्प राबविण्याबाबत**

**(२५) ८७०३६ (१८-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये विजेची कमतरता पाहता व त्यावर होणारा खर्च टाळण्यासाठी राज्यात बांधण्यात येण्याचा नविन इमारतीच्या छतावर सौर प्रकल्प (रुफ टॉप प्रकल्प) राबविण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प केंव्हापासून राबविण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदरील महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-११-२०१७) :** (१) ,(२) व (३) राज्य शासनाच्या शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.३६७/ऊर्जा-७,दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ अन्वये "नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून (अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत) विकेंद्रित पारेषण विरहीत ऊर्जा निर्मितीचे एकत्रित धोरण-२०१६" निश्चित करण्यात आले असून त्या अतंर्गत इमारतीचे छत (रूफटॉप) व जमिनीवरील पारेषण विरहीत सौर विद्युत संच आस्थापित करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बागलाण (जि. नाशिक) तालुक्यात कांदा पिकांची शिवर खरेदी करुन परप्रांतीय व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत

**(२६) ८७३१३ (१८-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यात कांदा पिकांची शिवार खरेदी करुन परप्रांतीय व्यापारी फरार झाल्याने शेतकऱ्यांची सुमारे अडीच कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे माहे मे,२०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नूसार शेतकऱ्यांची फसवणूक झालेली रक्कम शेतकऱ्यांना मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१७) :**(१) व (२) बागलाण तालुक्यातील नामपूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात स्थानिक व परप्रांतिय व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याची घटना घडल्यामुळे फसवणूक झालेले श्री.भाऊसाहेब कापडणीस, रा. दयाणे ता. बागलाण व इतर २८ शेतकऱ्यांनी स्थानिक व परप्रांतिय व्यापारी श्री. अनिल बसाया रा. गांधीनगर,श्री. अभियान पगार, उगाणे, ता. बागलाण श्री.थोटे, मुंबई, श्री.जयंत बागुल, जायखेडा, ता.बागलाण या व्यापाऱ्यांविरोधात पोलीस स्टेशन जायखेडा, ता.बागलाण येथे दिनांक ९/५/२०१७ रोजी गु.र.नं.८२/२०१७ ने गुन्हा दाखल केलेला असून, पोलीसांकडून पुढील तपास चालू आहे.

(३) पोलीस चौकशीचा अहवाल आल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. व्यापाऱ्यांनी केलेल्या कांद्याची खरेदी ही शिवार खरेदी असल्याने यासंदर्भात कृषि उत्पन्न बाजार समिती नागपूर यांचेकडे कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सुशिक्षित बेरोजगारांना उद्योगासाठी कर्ज पुरवठा होत नसल्याबाबत

**(२७) ८७७४१ (०४-०९-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद, नांदेड जिल्हयांसह इतर जिल्हयात जिल्हा उद्योग कैंद्राकडून सुशिक्षित बेरोजगारांची कर्ज प्रकरणे मंजूर होऊन बँकेकडे येऊनही बँकामार्फत कर्ज वाटप होत नसल्याचे माहे सप्टेंबर २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सुशिक्षित बेरोजगारांची उपासमार होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-११-२०१७) :**(१) नाही.
(२) लागू नाही.
(३) लागू नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील मालेगांव, भिवंडी, इचलकरंजी, सोलापूर, धुळे येथे यंत्रमागधारकांच्या विविध समस्यांबाबत

**(२८) ८८०६१ (१८-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मालेगांव, भिवंडी, इचलकरंजी, सोलापूर, धुळे इत्यादी ठिकाणी यंत्रमाग व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो, परंतु मागील दोन वर्षापासून या उदयोगावर मंदी आल्यामुळे पॉवरलुमधारक अडचणीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यंत्रमाग धारकांच्या विविध समस्यांबाबत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात आले होते, हे आंदोलन मागे घेण्याबाबत मा.वस्त्रोदयोग मंत्र्यांनी काही आश्वासने दिली होती परंतू अद्यापपर्यंत एकही आश्वासन पूर्ण झाले नाही,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-१२-२०१७) :**(१) माहे मे, २०१७ मध्ये असे निर्दशनास आले नाही, तथापि माहे जानेवारी, २०१७ मध्ये पॉवरलूम उद्योगामध्ये आलेल्या मंदीबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) व (३) नाही, तथापि मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांनी पॉवरलूमधारकांना त्यांच्या मागण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. मध्यंतरीच्या काळात साध्या पॉवरलूम धारकांच्या कर्जावरील ५ टक्के व्याज अनुदान शासनामार्फत अदा करण्याबाबत व २७ अश्वशक्ती व त्यापेक्षा कमी जोडभार असलेल्या साध्या पावरलूम धारकांना वीज बिलात रु.१/-सवलत देण्याच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दि. १२ जुन, २०१७ रोजी बैठक झाली. त्यानुसार साध्या पॉवरलूम धारकांच्या कर्जावरील ५ टक्के व्याज अनुदान शासनामार्फत अदा करण्याबाबतचा निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे व २७ अश्वशक्ती व त्यापेक्षा कमी जोडभार असलेल्या साध्या पॉवरलूम धारकांना वीज बिलात रु.१/-सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार नविन उद्योग उभारणीसाठी करामध्ये देण्यात येणाऱ्या सवलतीबाबत

**(२९) ८८१८३ (१८-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामुहिक प्रोत्साहन योजना सन १९९३ नुसार नवीन उद्योग उभारणीकरिता 'डी' आणि 'डी प्लस' झोनमध्ये गुंतवणूकीच्या १०० टक्के विक्री करामध्ये सवलत देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किसान सहकारी स्टार्च कारखाना (जि.धुळे) व जळगाव जिल्हा सहकारी मका उत्पादक संस्था, जळगाव या सहकारी तत्वावर मक्यावर प्रक्रिया करून स्टार्च बनविणारे दोन प्रकल्प कार्यरत आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, ५०.०० कोटी पर्यंत गुंतवणूक असलेले हे दोन्ही प्रकल्प रू.५०.०० कोटींच्या विक्रीकराला पात्र असताना व्यवस्थापनाच्या अडचणीमुळे दोन्ही प्रकल्प बंद पडले आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सामुहिक प्रोत्साहन योजना सन १९९३ च्या मुळ संकल्पनेनुसार गुंतवणूकीच्या प्रमाणात विक्री करामध्ये सवलत मिळणे अपेक्षित असताना उपरोक्त दोन्ही प्रकल्पांची राज्य सहकारी बँकेने अत्यंत कमी किंमतीत विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवीन संस्थेची खरेदीची किंमत रू.१५.०० कोटी इतकीच मर्यादीत असल्यामुळे त्यांना या किंमतीवर सवलत देण्याऐवजी मुळ प्रकल्पाच्या रू.५०.०० कोटी गुंतवणूकीवर सवलत दिलेली आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाच्या या धोरणामुळे अन्य युनिटवर परिणाम होत असून शासनाच्या महसूलाचेही नुकसान होत असल्याने याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२७-११-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) मे.किसान सहकारी स्टार्च कारखाना जि.धुळे हा घटक व्यवस्थापनाच्या अडचणीमुळे बंद पडला होता. घटक सन २००९ मध्ये एनपीए मध्ये गेल्याने बँकेमार्फत सन २०१० मध्ये मे.ट्रेडको किसान प्रा.लि. यांना विक्री करण्यात आला आहे.

मे.जळगाव जिल्हा सहकारी स्टार्च उत्पादक सहकारी संस्था, जळगाव सततच्या तोटयामुळे हा कारखाना स्वत: संस्थेकडून पुनर्जिवीत करणे व चालवणे शक्य नसल्यामुळे तसेच बँक कर्ज व इतर देणी देणे शक्य नसल्याची खात्री झाल्यामुळे मार्च,२००३ पासून ही संस्था अवसायानात आल्यामुळे कर्ज पुरवठादार बँकेने संस्था ताब्यात घेऊन हा प्रकल्प मे.ऑनेस्ट डेरिव्हेटीव्ह प्रा.लि. यांना विक्री केलेला आहे.

(४) व (५) सामुहिक प्रोत्साहन योजना सन १९९३ अंतर्गत पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीवर प्रोत्साहने अनुज्ञेय होतात. एखादया पात्रता प्रमाणपत्र प्राप्त घटकाची मालकी हस्तांतरीत झाल्यास त्याचे पात्रता प्रमाणपत्र सुध्दा हस्तांतरीत करण्याची तरतुद आहे.

(६) हे खरे नाही.

---

## सैनिकांच्या कुटुंबियांना उल्हासनगर एम.आय.डी.सी. मध्ये २० टक्के आरक्षित भूखंड देण्याबाबत

**(३०) ८८५९९ (१८-०८-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजी सैनिकांसह त्यांच्या कुटुंबियांना उल्हासनगरच्या एम.आय.डी.सी. मध्ये २० टक्के भूखंड आरक्षित ठेवल्यास सैनिकांच्या विरमाता / विरपत्नी यांना स्वतःच्या पायावर उभे राहून लघुउद्योग सुरू करता येतील व पर्यायाने त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल याकरीता माजी सैनिक सेवा मंडळाचे पदाधिकारी यांनी केंद्र व राज्य सरकारकडे मागणी केल्याची बाब दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे

तथापि उल्हासनगर मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्र नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील टेंभू योजना सौरऊर्जेतून चालविण्याबाबत**

**(३१) ८८६८९ (२४-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील टेंभू योजना सौरऊर्जेतून चालविण्याकरीता महाजनको कंपनीचे सुरु असलेले सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षणाचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-१२-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) टेंभू उपसा जलसिंचन योजना क्षेत्रात ६० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी महानिर्मितीव्दारे निविदा प्रक्रिया सुरू आहे.

---

**रायगड जिल्हयातील पातळगंगा, तळोजा, रोहा, महाड, विळेभागाड, उसर या ठिकाणी औद्योगिक वसाहतीकरीता करण्यात आलेले भूसंपादन**

**(३२) ८८८३३ (१८-०८-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पातळगंगा, तळोजा, रोहा, महाड, विळेभागाड, उसर या ठिकाणी औद्योगिक वसाहतीकरीता जिल्हयातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे अत्यंत कमी भावाने भूसंपादन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील ५०० हून अधिक प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झालेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पांमधील सुमारे चार हजार प्रकल्पग्रस्त अद्यापी नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :** (१) जमिनीचे संपादन केले ही बाब खरी आहे. महामंडळाने रायगड जिल्हयात महाड, अतिरिक्त महाड, रोहा, उसर, विळे भगाड व शहापूर नागोठणे औद्योगिक क्षेत्र विकसित केली आहेत. सदर औद्योगिक क्षेत्रासाठी जमीनी संपादन करताना शेतकऱ्यांशी वाटाघाटी करुन जमीनीचे दर ठरविण्यात आलेले आहेत. तसेच भूसंपादन अधिकाऱ्यामार्फत रितसर भूसंपादन करण्यात येऊन शेतकऱ्यांना जमीनीची नुकसान भरपाई वाटप केलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

जमीन संपादन करतांना महामंडळ त्या त्या वेळच्या प्रचलित धोरणाप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना विकसित जमीनीतील भूखंड परतावा म्हणून वाटप केले जातात. जमीन संपादन केल्यानंतर महामंडळ व उद्योजक यांच्यामध्ये प्राथमिक व अंतिम करारनामा यामध्ये भूपिडीतांना प्राधान्याने त्यांची शैक्षणिक पात्रता तपासून नोकरीत सामावून घेण्याची अट नमूद केलेली असते व तसे प्राधान्य प्रमाणपत्र महामंडळाकडून दिले जाते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी पायाभूत सोयीसुविधांची कामे सुरु करणेबाबत**

**(३३) ८९१९५ (१८-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करणेकरिता पाणीपुरवठा योजनेस माहे डिसेंबर, २०१५ मध्ये प्रशासकीय मान्यता देऊनही माहे मे, २०१७ पर्यंत सदर योजनेचे काम प्रत्यक्षात सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिंचोडी (ता.येवला, जि.नाशिक) येथील औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सोयीसुविधांच्या कामांचा प्रस्ताव माहे डिसेंबर, २०१५ पासून म.रा.औ.वि.महामंडळाच्या मुख्यालयामध्ये प्रशासकीय मान्यता देण्याकरिता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने सदर नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याकरिता प्रलंबित कामे लवकर सुरू करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान म.रा.औ.वि.महामंडळाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-११-२०१७) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १/०६/२०१७ च्या पत्रान्वये प्रलंबित कामे सूरू करण्याची मागणी केलेली आहे.

(४) येवला औद्योगिक क्षेत्रासाठी पाणीपुरवठा योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यांनतर सदर कामाची निविदा काढण्यात आली असून, दिनांक ०१/०९/२०१७ रोजी काम सुरू करण्याचा कार्यालयीन आदेश काढण्यात आलेला आहे. सदर कामाचा कालावधी १२ महिने असा आहे.

चिंचोडी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या कामाचा प्रशासकीय मंजूरीचा प्रस्ताव औद्योगिक क्षेत्रातील भूखंडासाठी मागणी/प्रतिसादाची पडताळणी करून प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार १५ टक्के विकसित भूखंडाचे वाटपाबाबत

**(३४) *८९२८३ (१८-०८-२०१७).* श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील अतिरिक्त औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्र टप्पा -२ मधील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना महामंडळाच्या धोरणानुसार १५ टक्के विकसित भूखंडाचे वाटप करण्यात दूर्लक्ष होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १५ टक्के भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

ठाणे जिल्हयातील अति. अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील टप्पा २ व ३ मधील मौजे बोहोनोली येथील एकूण १६ प्रकल्पग्रस्त आहे त्यापैकी ६ प्रकल्पग्रस्तांना पीएपी भूखंड वाटप करण्याबाबत सुरुवात करण्यात आलेली आहे, प्राप्त अर्जानुसार पीएपी भूखंड वाटप करण्यात येत आहे.

पाले औद्योगिक क्षेत्रातील ८६ खातेदारांपैकी प्रकल्पग्रस्ताचे ९ अर्ज प्राप्त आहेत. उर्वरित खातेदाराकडून अर्ज मागवून भूखंड वाटप करण्याची तजवीज ठेवली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर विभागात सेवाज्येष्ठतेनुसार पात्र व ज्येष्ठ कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत**

**(३५) ८९३८१ (१८-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात दिनांक ८ सप्टेंबर,२०१४ व माहे एप्रिल,२०१७ मध्ये झालेल्या नियमबाह्य पदोन्नती सभेतील निवडपात्र कर्मचा-यांना पदावनत करून सेवाज्येष्ठतेनुसार पात्र व ज्येष्ठ कर्मचा-यांना पदोन्नती देऊन न्याय देण्याबाबतचे निवेदन दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास सहकार सचिव, महाराष्ट्र राज्य, व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे व त्यानुसार सेवाज्येष्ठतेनुसार व ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेप), नागपूर यांचेमार्फत छाननी केली. त्यानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेप), नागपूर यांनी त्यांच्या दि.१५/९/२०१७ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सहा.आयुक्त मागासवर्गीय कक्ष, नागपूर विभाग, नागपूर यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेप), नागपूर कार्यालयातील वर्ग-३ चे कर्मचाऱ्यांचे बिंदुनामावली दि.१४/६/२०११, १२/०८/२०१४ व २१/०१/२०१७ अन्वये आरक्षण प्रमाणित करुन दिलेले आहे. सदर प्रमाणित केलेल्या आरक्षणानुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेप), नागपूर यांनी त्यांचे विभागात कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या दिलेल्या आहेत. एकंदरीत पदोन्नत्या देताना अनुषंगिक शासन निर्णय, परिपत्रके व आरक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन पदोन्नत्या दिल्या असल्याचे दिसून येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) येथील अनेक लाभार्थी संजय गांधी निराधार**
**योजनेपासून वंचित असलाबाबत**

**(३६) ८९७६४ (०९-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वृध्द, विधवांचे संजय गांधी निराधार योजनांचे अर्ज तहसीलदार कार्यालयात प्रलंबित असल्याने आदिवासी निराधार योजनेच्या लाभापासून वंचित असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर चप्पलेला पेटंट मिळणेबाबत**

**(३७) ९०१६४ (०४-०९-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूरची ख्याती जगभर पोहोचवणारी सुबक आकार, नक्षीकाम आणि टिकावूपणा ही ठळक वैशिष्टये असणाऱ्या कोल्हापूर चप्पलेला पेटंट मिळविण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला आहे,
(२) असल्यास, कोल्हापूरी चप्पलेला पेटंट मिळविण्यात राज्य शासनाला यश मिळाले आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२७-११-२०१७) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळामार्फत कोणतेही पेटंट नोदविण्यात आलेले नाही. तसेच मंडळामार्फत राज्य शासनाकडे किंवा केंद्र शासनाकडे असा प्रस्ताव प्रलंबित नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळामार्फत कोल्हापूरी चप्पलेमध्ये आधुनिकता यावी या हेतूने या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन तथा प्रशिक्षण देण्याचे काम कोल्हापूर येथे सुरु आहे. सदर प्रशिक्षणामध्ये कोल्हापूरी चप्पलेचे पारंपारीक डिझाईन बदलून त्यामध्ये आधुनिक डिझाईन तयार करण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन मिळत आहे. तसेच यासाठी "कलात्मक कोल्हापूर" असे ब्रँडनेम नोंदविण्यात आलेले आहे. या प्रमाणे प्रशिक्षणातून नवीन डिझाईन्स तयार झाल्यास कोल्हापूरी चप्पलेला चांगला काळ येऊ शकेल यासाठी खादी व ग्रामोदयोग मंडळाने कोल्हापूरी चप्पल उद्योगाच्या पुन:रुजीवनाचे काम हाती घेतले आहे.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील ४४ महसुली गावांचा समावेश पेसा कायद्यांतर्गत करण्याबाबत**

**(३८) ९०२५४ (१२-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

वि.स. ३७६ (28)

**श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील ४४ महसुली गावांचा समावेश पेसा कायद्यांतर्गत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील २१ पाडे, वाडया व वसत्या यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधितांकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधीच्या उक्त मागणीनुसार साक्री तालुक्यातील ४४ महसुली गावांचा पेसा कायद्यांतर्गत समावेश करण्याबाबत व उक्त तालुक्यातीलच २१ पाडे, वाडया व वसत्या यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२४-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मा. विधानसभा सदस्य यांनी दि. १२.०६.२०१७ च्या पत्रान्वये साक्री तालुक्यातील २१ पाडे, वाडया व वस्त्यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांना विनंती केली होती. तद्नुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) सन २०११ च्या जनगणनेसार अनुसूचित क्षेत्रातील गावांपासून नव्याने निर्माण झालेल्या गावांचा तसेच आदिवासी लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असलेल्या व आदिवासी उपयोजना क्षेत्रास भौगोलिकदृष्टया संलग्न असलेल्या गावांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश करण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याचे काम आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या स्तरावर अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रस्तावामध्ये साक्री ( जि. धुळे ) तालुक्यातील एकूण ४४ गावांचा समावेश विचाराधिन आहे. सदर गावांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश करण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाल्यावर केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

जिल्हाधिकारी, धुळे यांनी साक्री तालुक्यातील २१ गावांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबतचे प्रस्ताव अपर तहसिलदार, पिंपळनेर यांचेकडून मागविलेले असून त्यापैकी एका गावाचा प्रस्ताव त्यांच्याकडे प्राप्त आहे. उर्वरीत प्रस्ताव अपर तहसिलदार, पिंपळनेर यांचेमार्फत चौकशी करुन उपविभागीय अधिकारी, धुळे यांच्याकडून प्राप्त करुन नविन स्वतंत्र महसूल गावांत रुपांतर करण्याची तजविज जिल्हाधिकारी, धुळे यांनी ठेवली आहे.

___

**भाळवणी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे महापारेषण कंपनीकडून संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळाले नसल्याबाबत**

**(३९) ९०७३३ (०९-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाळवणी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील येथे १३२ के.व्ही चे वीज उपकेंद्र उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज उपकेंद्र व त्यासाठी टॉवर उभारण्यासाठी महापारेषण कंपनीकडून संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापही शेतक-यांना मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर शेतक-यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-११-२०१७) :**(१) निंबोणी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) या ठिकाणी १३२ के.व्ही.चे उपकेंद्र उभारण्यात आले आहे.

(२) व (३) सदर वीज उपकेंद्रासाठी लागणाऱ्या शासकीय जमिनीची नियमानुसार किंमतीची रक्कम भरुन त्याचा ताबा महापारेषण कंपनीने घेतला आहे. वाहिनीचे मनोरे उभारण्यासाठी जमिन संपादित करण्यात आलेली नाही. परंतु, तिचा मोबदला देण्याची कार्यवाही सुरु असून एकूण ९ प्रकरणांमध्ये रु. २.२३ लाख एवढी रक्कम तत्कालीन दि.०१.११.२०१० च्या शासन निर्णयानुसार देण्यात आली आहे. तसेच दिनांक ३१.०५.२०१७ नंतरच्या प्रकरणाबाबत प्रचलित शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. वाहिनी उभारणी करतेवेळी उभ्या पिकांच्या झालेल्या नुकसानापोटी एकूण १६१ प्रकरणांमध्ये रु. ४९.७६ लाख एवढी नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी आणि आर्वी तालुक्यात (जि.वर्धा) एम.आय.डी.सी. स्थापन करण्याबाबत**

**(४०) ९१४८३ (१८-०८-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाच्या स्वातंत्र लढ्यामध्ये मोलाचे योगदान असलेल्या आष्टी (जि.वर्धा) तालुक्यात एम.आय.डी.सी.नाही व त्यामुळे एकही उद्योग नसल्याने येथील युवक रोजगारासाठी इतर जिल्ह्यात स्थलातंरीत होत असल्याने आष्टी व आर्वी तालुक्यात एम.आय.डी.सी.ची स्थापना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयास दिंनाक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी व आर्वी तालुक्यात एम.आय.डी.सी.ची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनानुसार आर्वी तालुक्यामध्ये औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी (वृद्धापकाळ, विधवा, अपंग) योजनेमध्ये मिळणारे अनुदान वाढविण्याबाबत**

**(४१) ९१६७० (०९-०८-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संजय गांधी निराधार योजना वृद्ध व्यक्ती, अंध अपंग, शारीरिक व मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती व निराधार विधवांना अर्थसहाय्य या हेतूने सन १९८० पासून राबविण्यात येत असून इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेला पूरक म्हणून श्रावणबाळ योजना सन २००४ पासून राबविण्यात येत आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्रतिमहा रु. ६०० लाभ मिळत आहे व यामध्ये रु. २०० केंद्र शासनाकडून व रु. ४०० शासनाकडून मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या योजनेच्या लाभार्थ्यांना सतत आर्थिक त्रास सहन करावा लागत असून वाढत्या महागाईच्या काळात रु. ६०० मिळणारी लाभाची रक्कम १००० रुपयापर्यंत वाढवून मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) संजय गांधी, श्रावणबाळ व इंदिरा गांधी (वृध्दापकाळ, विधवा, अपंग) या योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणा-या मासिक अनुदानामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक भूखंडासाठी अर्ज करणा-या उद्योजकांना भूखंड वाटप करण्याबाबत

**(४२) ९१७९१ (१८-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात औद्योगिक भूखंड वाटपासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाने सन २०१४ मध्ये ऑनलाईन प्रक्रिया सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रक्रियेंतर्गत भूखंड मागणीसाठी उद्योजकांनी केलेल्या अर्जानुसार भूखंड वाटप न करता दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास सर्व अर्ज रद्द करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून सन २०१४ पासून औद्योगिक भूखंडासाठी अर्ज करणा-या उद्योजकांना त्वरीत भूखंड वाटप करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१७) :**(१) होय.

(२) हे खरे आहे.

अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंड क्रमांकासहित नियोजन आराखडे मंजूर असलेले भूखंड वाटपास उपलब्ध नसल्यामुळे महामंडळाचे परिपत्रक जावक क्र. बी-२४९०१, दि. २६/४/२०१६ मधील निर्देशानुसार अर्ज रद्द करण्यात आले आहेत.

(३) सद्य:स्थितीत महामंडळाचे ई- अलॉटमेंट धोरणानुसार भूखंड वाटपाची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसंतदादा सहकारी साखर कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास देऊनही शेतकरी व कामगारांची देणी प्रलंबित असल्याबाबत

**(४३) ९१८४० (१८-०८-२०१७). श्री.धनंजय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतदादा सहकारी साखर कारखाना जिल्हा बँकेने सिक्युरीटायझेशन ॲक्ट खाली ताब्यात घेऊन भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेच्या कर्जापेक्षाही शेतकऱ्यांची बिलासाठीची देणी व कामगारांची देणी ही रक्कम मोठी असून ती अद्यापही देण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसंतदादा सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या बिले व कामगारांची देणी यांची किती रक्कम थकीत आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच शेतकऱ्यांची बिले व कामगारांची थकीत रक्कम देणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) जुलै, २०१७ अखेर कामगारांची थकित रक्कम रू. ११००.०० लाख व सन २०१३-१४ मधील शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम रु.८०९.९६ लाख इतकी थकीत आहे.

(४) व (५) कामगारांचे रु.३२५.०९ लाख जुलै, २०१७ मध्ये अदा केली आहे. शासनाकडून सन २०१३-१४ हंगामासाठी आर.आर.सी.ची कारवाई होऊन जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडून कारखाना जमिनीवर महसूली बोजा चढविण्याची कारवाई झालेली आहे.

---

**पाचोरा पंचायत समितीचे (जि.जळगांव) सभापती यांच्या आई-वडिलांचे निराधार यादीत नाव असल्याबाबत**

**(४४) ९२०१८ (१८-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा पंचायत समितीचे (जि. जळगांव) सभापती यांच्या आई-वडिलांचे निराधार यादीत नाव असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मंडळ अधिकारी यांच्यामार्फत स्थानिक चौकशी करण्यात आली असून सभापती यांच्या आईच्या नावे १ हेक्टर ३० आर. व वडिलांच्या नावे ५४ आर. इतकी शेतजमीन असल्याचे आढळून आली. चौकशीनंतर सदर लाभार्थ्यांना अनुदान वाटप आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासा (जि. अहमदनगर) शहरातील प्रभाग तीनमध्ये असलेल्या उच्चदाबाची विद्‌युतवाहिनी नेवास शहराबाहेर स्थलांतरीत करण्याबाबत**

**(४५) ९२२३७ (०९-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) शहरातील प्रभाग तीनमधील असलेल्या शिवाजीनगर, सदाशिवनगर, विवेकांनदनगर या वसाहतीमधील नागरिकांसाठी घातक ठरलेली उच्चदाबाची

विद्युतवाहिनी नेवासा शहराबाहेर स्थलांतरीत करण्याबाबत मागणी तेथील नागरिकांनी मा.ऊर्जामंत्री यांच्याकडे दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नेवासा शहरातील प्रभाग ३ मध्ये असलेल्या शिवाजीनगर, सदाशिवनगर, विवेकानंदनगर, वसाहतीमधील नागरिकांसाठी धोकादायक असलेल्या ११ के.व्ही. उच्चदाब वाहिनीसाठी पर्यायी व सुरक्षिततेसाठी, पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत ०.९ कि.मी. ११ के.व्ही. वाहिनीची उभारणी करण्यात आली व नवीन उभारण्यात आलेल्या ११ के.व्ही. वाहिनीव्दारे सध्या वीज पुरवठा करण्यात येत आहे. सदर वसाहतीमधील जुनी ११ के.व्ही. वाहिनी पूर्णत: बंद ठेवण्यात आली आहे. सदरचे काम हे सप्टेंबर, २०१७ मध्ये पूर्ण झालेले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## हिंगोणा (ता.यावल, जि.जळगाव) येथील मोर धरणाच्या ३०० एकर जमिनीवर सौर उर्जा प्रकल्प उभारणेबाबत

**(४६) ९२२५८ (०९-०८-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोणा (ता.यावल जि.जळगाव) येथील मोर धरणाच्या ३०० एकर परिसरात सौर उर्जा प्रकल्प उभारणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१६ मार्च, २०१७ रोजीच्या पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सौर उर्जा प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-१२-२०१७) :** (१) होय.

(२) मोर धरणाच्या परिसरात ६५ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनाच्या जलसंपदा विभागास प्राप्त झाला असून, महानिर्मिती कंपनीव्दारे निविदा मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांसाठी " मुख्यमंत्री सौर वाहिनी योजना" सुरु करण्याबाबत**

**(४७) ९३१२४ (१८-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी "मुख्यमंत्री सौर वाहिनी योजना" सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-११-२०१७) :**

(१) होय. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या ऊर्जा शाखेच्या दि. १४/२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली आहे.

(२) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत:-

१) राज्यातील ज्या ग्रामीण भागामध्ये गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले आहे अशा ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर ऊर्जेव्दारे विद्युतीकरणाची योजना आहे.

२) याचा फायदा कृषी ग्राहकांना शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या लिफ्ट इरिगेशन योजनांना वीज पुरवठा करण्यासाठी होणार आहे.

३) या योजनेची अंमलबजावणी महानिर्मिती या कंपनीव्दारे महाऊर्जा व महावितरण कंपनीच्या सहाय्याने करण्यात येईल. सदर योजना खाजगी- लोक सहभाग तत्वावर राबविण्यात येईल.

४) पारदर्शक व स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवून खाजगी गुंतवणूकदार निवडून त्यांच्यासमवेत सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्याकरिता विशिष्ट कालावधीकरिता करार करण्यात येईल.

५) प्रकल्पाची उभारणी व देखभाल दुरूस्ती खाजगी गुंतवणूकदाराकडून होईल.

६) यामुळे पारंपरिक वीजेची बचत होऊन अशा विजेचा वापर इतर उत्पादनक्षम कामासाठी होईल. तसेच महावितरण कंपनीचा विजेच्या खरेदीवरील खर्च कमी होईल.

(३) सदर योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत महानिर्मिती पीपीपी तत्वावर प्रारंभी सदर योजनेनुसार प्रायोगिक तत्वावर मांजरडा (कोलंबी) ता.जि. यवतमाळ येथील ४ हे.आर शासकीय भुखंडावर २ मे.वॅ. तसेच राळेगणसिध्दी ता. पारनेर जि.अहमदनगर येथील ३ हे. ५० आर खाजगी जमीनीचा वापर करून २ मे.वॅ. सौर कृषी वाहिनी प्रकल्प प्रायोगिक तत्वावर करण्याचे ठरविले आहे. सदयस्थितीत वरील ४ मे.वॅ. क्षमतेचे सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी इरादापत्र निर्गमित करण्यात आले आहेत.

महानिर्मिती कंपनीतर्फे राज्यात १५०० मे.वॅ. क्षमतेचे सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी विविध ठिकाणी महसूल विभागाच्या शासकीय भूखंडाची निवड सूरू आहे. तसेच विदर्भ, मराठवाडा, पश्चिम व उत्तर महाराष्ट्र येथे प्रत्येकी ५० मे.वॅ. क्षमतेचे सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया सूरू आहे.

---

**औरंगाबाद जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४८) ९३७१६ (१८-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक १० मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेत निराधार लाभार्थ्यांना केवळ सहाशे रुपये मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती गैरव्यवहार करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१७) :** (१) व (२) संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० नुसार पात्र लाभार्थ्यास दरमहा रु.६००/- आणि एका कुटुंबात एका पेक्षा जास्त लाभार्थी असल्यास दरमहा रु. ९००/- इतके अनुदान देण्यात येते. औरंगाबाद जिल्हयात विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांना माहे जून, २०१७ अखेरपर्यंतचे अनुदान वाटप करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

सदर योजनेच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील घोडेगांव प्रकल्प कार्यालयातील तत्कालिन प्रकल्प अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४९) ९३८६२ (०९-०८-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील घोडेगांव प्रकल्प कार्यालयातील तत्कालिन प्रकल्प अधिकारी यांनी सन २०१३ व २०१६ या कालावधीत वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या, विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत कृषी विभागाच्या योजना, भाजीपाला, भोजन ठेका इत्यादी निविदा प्रक्रियेत केलेल्या गैरव्यवहाराबाबत उपायुक्त,ठाणे व प्रकल्प अधिकारी, धुळे यांची माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान चौकशी समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, सदर अहवाल शासनास केव्हा सादर करण्यात आला आहे,

(३) तसेच सदर अहवालाच्या अनुषंगाने दोषी तत्कालीन प्रकल्प अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (३०-१०-२०१७) :** (१) होय, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी याबाबत प्राथमिक चौकशी समिती गठित केली आहे.

(२) होय, सदर समितीने सादर केलेला प्राथमिक चौकशी अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी शासनास सादर केला आहे.

(३) व (४) चौकशी समितीचा प्राथमिक अहवाल विचारात घेऊन अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी गट-क मधील ५ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

तसेच, सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या वर्ग-१ ते वर्ग-४ मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द एकत्रित विभागीय चौकशी सुरु करण्याच्या अनुषंगाने, सुधारीत प्रारुप दोषारोप पत्र अनुषंगिक कागदपत्रांसह आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून नुकतेच प्राप्त झाले असून, याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## कजोली (ता.हिंगणा, जि. नागपूर) येथील अहिल्याबाई होळकर आश्रमशाळेत सुरू असलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत

**(५०) ९४१०२ (०९-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी तालूक्यातील (जि.अमरावती) कजोली गावातील ४० आदिवासी विद्यार्थ्यांना विविध प्रलोभने दाखवून नागपूर परिसरातील हिंगणा येथील अहिल्याबाई होळकर आश्रमशाळेतील

संचालकांनी प्रवेशित करुन घेतले मात्र तेथील गैरसोयी आणि संस्थाचालक व कर्मचा-यांकडून होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून चार विद्यार्थी पलायन करून चार दिवस चालत आपल्या गावी गेल्याची घटना दिनांक २९ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या घटनेची माहिती इतर पालंकाना समजल्यानंतर ते आपल्या मुलांना घरी परत नेण्यासाठी आले असता संस्था चालकांनी आधी पाच हजार रूपये दया व नंतरच विद्यार्थ्यांना घेऊन जा असे पालकांना सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच आश्रमशाळेत सुरू असलेल्या गैरप्रकाराची माहिती संकलित करण्यासाठी वृत्तवाहिनीचे पाच ते सहा पत्रकार गेले असता संस्थाचालक आणि तेथील कर्मचाचांनी पत्रकारावर हल्ला करून जखमी केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात आली वा करण्यात येत आहे काय, त्याचा तपशिल काय आहे

(५) असल्यास, या प्रकरणी संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-११-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे. दिनांक २२.६.२०१७ रोजी काही विद्यार्थ्यांचे पालक शाळेत आले होते. त्यांचेसोबत एक विद्यार्थी गांवी निघून गेला. दिनांक २४.६.२०१७ रोजी पहाटे ४.०० ते ४.३० वाजता शाळेची संरक्षक भिंतीवरुन उडी मारुन तीन विद्यार्थ्यांनी पलायन केले होते. सदर बाब निदर्शनास आल्यावर पोलीस स्टेशन, हिंगणा तेथे तक्रार देण्यात आली व विद्यार्थ्यांच्या पालकांनाही कल्पना देण्यात आली. दिनांक २६.६.२०१७ रोजी एका व्यक्तीने तीनही विद्यार्थी घरी सुखरुप पोहोचल्याचे कळविले. त्यानंतर टप्प्याटप्प्याने कजोली येथील ६५ विद्यार्थ्यांपैकी ४० विद्यार्थी पालकांकडे स्वग्रामी गेल्याची माहिती चौकशी दरम्यान शाळेच्या मुख्याध्यापकांनी दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) वृत्तवाहिनीच्या पत्रकारांवर हल्ला करुन त्यांना जखमी केल्याबाबतची कोणतीही तक्रार प्रकल्प कार्यालय, नागपूर वा अपर आयुक्त कार्यालय, नागपूर यांना प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.